ग्रामीण पाणी पुरवठा कार्यक्रमाच्या अंमलबजावणीसाठी सुधारित मार्गदर्शक सूचना..

**महाराष्ट्र शासन**
**पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग**
**शासन शुध्दिपत्रक, क्रमांक ग्रापाधो-११०९/प्र.क्र.१०४(अ)/पापु-०७**
**मंत्रालय, मुंबई-४०० ०३२**
**दिनांक : ३० ऑगस्ट, २०१०**

**वाचा :-** १) शासन निर्णय क्र.ग्रापापु- १०९९/प्र.क्र.३२८/पापु-०७, दि. २७ जुलै, २०००.
२) शासन निर्णय क्र.ग्रापापु- १००१/प्र.क्र.१९०/पापु-०७, दि.०३ सप्टेंबर, २००१.
३) शासन परिपत्रक क्र. ग्रापापु- १००२/प्र.क्र.५३२/पापु-०७, दि. २३ मार्च, २००२.
४) "राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रम" (National Rural Drinking Water Programme - NRDWP) बाबतच्या केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचना.
५) शासन निर्णय क्र. ग्रापाधो-११०९/प्र.क्र.१०४/पापु-०७, दि. ०१ ऑगस्ट, २००९
६) शासन निर्णय क्र. ग्रापाधो-११०९/प्र.क्र.११५ /पापु-०७, दि.०९ सप्टेंबर, २००९
७) शासन निर्णय क्र. ग्रापाधो-११०९/प्र.क्र.१०४(अ)/पापु-०७, दि. १७ मार्च, २०१०

**प्रस्तावना :**

केंद्र शासनाच्या सुधारित मार्गदर्शक सुचनांनुसार ग्रामीण पाणी पुरवठा कार्यक्रमाची अंमलबजावणी अधिकाधिक परिणामकारक व्हावी यासाठी योजना अंमलबजावणीसाठीच्या प्रचलित पध्दती व निकषांमध्ये सुधारणा करण्यासाठी संदर्भ क्र-५ येथील शासन निर्णय निर्गमित करण्यात आला होता. हा शासन निर्णय शासनाच्या मागणी आधारित लोकसहभागाच्या धोरणाशी अधिक सुसंगत असावा आणि पाणी पुरवठा योजनांची अंमलबजावणी अधिक परिणामकारक करता यावी म्हणून संदर्भ क्र. ७ येथील शासन निर्णय निर्गमित करण्यात आला होता. या शासन निर्णयाच्या अंमलबजावणीत अडचणी येत असल्याचे निदर्शनास आल्याने त्यात सुधारणा करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन शुध्दिपत्रक :**

संदर्भ क्र.७ येथील शासन निर्णयातील परिच्छेद क्र. २.३ आणि परिच्छेद क्र. ११ ऐवजी पुढीलप्रमाणे वाचण्यात यावे.

२.३ रु.५.०० कोटीपर्यंत किमतीच्या पाणी पुरवठा योजनांना प्रशासकीय मान्यता देण्याचे अधिकार संबंधित गावच्या ग्रामसभेस देण्यात येत आहेत. रु.५.०० कोटीपेक्षा जास्त किमतीच्या योजनांना शासनस्तरावरून प्रशासकीय मान्यता देण्यात येईल. विहित दरडोई खर्चाच्या निकषांमध्ये न बसणा-या सर्व योजना प्रशासकीय मान्यतेसाठी शासनाकडे निर्णयार्थ पाठविण्यात याव्यात.

११. सर्वसाधारण क्षेत्रासाठी किमान ५ टक्के व दलित तसेच आदिवासी क्षेत्रासाठी किमान १ टक्के लोकसहभागाची रोख रक्कम ग्राम आरोग्य, पोषण, पाणी पुरवठा, स्वच्छता व पर्यावरण समितीच्या खात्यावर रोखीने जमा केल्यानंतर शासन सहभागाच्या रकमेपैकी ३० टक्के निधी पहिला हप्ता म्हणून समितीच्या खात्यावर जमा करण्यात येईल. ह्या निधीतून समितीने केवळ स्त्रोत विकासाचे काम हाती

घ्यावे व पूर्ण करावे. स्त्रोताच्या सक्षमतेबाबत भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणेचे योग्यता प्रमाणपत्र घेतल्यानंतरच इतर कामे हाती घ्यावीत.उर्वरित लोक वर्गणीच्या रकमेपैकी सर्वसाधारण क्षेत्रासाठी ५ टक्के व दलित व आदिवासी क्षेत्रासाठी ४ टक्के लोकसहभागाची रक्कम रोखीने जमा केल्यानंतर दुस-या हप्त्याची ३० टक्के रक्कम देण्यात यावी. या रकमेचा पूर्ण विनियोग झाल्यानंतर ३० टक्केचा तिसरा हप्ता वितरीत करण्यात यावा. उर्वरित १० टक्के निधी योजना पुढील १ वर्ष सुरळीत चालविल्यानंतर समितीस अदा करण्यात येईल.

२. दि. १७ मार्च, २०१० च्या शासन निर्णयातील परिच्छेद ७.१ मध्ये उल्लेखिलेली परिशिष्ट-अ अनावधनाने त्या शासन निर्णयासह जोडण्यात आलेले नव्हते. ते सदर परिशिष्ट या शासन निर्णयासह जोडण्यात येत आहे. गावे / वाडयांसाठी पिण्याच्या पाणी पुरवठा उपाययोजनांचे नियोजन करताना गावातील पिण्याच्या पाण्याच्या व्यवस्थेबाबतची तपशीलवार माहिती या प्रपत्रात सादर करणे अनिवार्य आहे.

३. शासन निर्णयातील इतर तरतूदीत कोणताही बदल नाही.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या वेब साईटवर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक सांकेतांक २०१००८३०१५५४५४३००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(डॉ.निपुण विनायक)
उप सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रत,

मा.मंत्री (पाणी पुरवठा व स्वच्छता) यांचे खाजगी सचिव,
मा.राज्यमंत्री (पाणी पुरवठा व स्वच्छता) यांचे खाजगी सचिव
विभागीय आयुक्त (सर्व)
सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई
संचालक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, पुणे
सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद
सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य लेखा व वित्त अधिकारी,
सर्व अधिक्षक अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण
सर्व कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद
महालेखापाल, महाराष्ट्र - १, मुंबई (लेखा परीक्षा/लेखा व अनुज्ञेयता)
महालेखापाल, महाराष्ट्र - २, नागपूर (लेखा परीक्षा/लेखा व अनुज्ञेयता)
मुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी लेखा, नवी मुंबई
उप मुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी लेखा, नाशिक, पुणे, औरंगाबाद, अमरावती व नागपूर
प्रादेशिक उपसंचालक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा सर्व
प्रादेशिक मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण सर्व
जिल्हा वरिष्ठ भूवैज्ञानिक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा सर्व
कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण सर्व
गट विकास अधिकारी, पंचायत समिती सर्व
नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई
वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई,
ग्राम विकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई
मंत्रालयातील इतर सर्व विभाग,
पाणी पुरवठा व स्वच्छता विभागातील सर्व पर्यवेक्षीय अधिकारी व कार्यासने
निवडनस्ती, कार्यासन क्रमांक पापु-०७

# परिशिष्ठ-अ

शासन शुध्दिपत्रक दि. ३० ऑगस्ट, २०१० चे सहपत्र

## गाव /वाडी / वस्ती / तांडा यामध्ये नव्याने नळ पाणी पुरवठा योजना घ्यावयाची असल्यास सादर करावयाची तपशीलवार माहिती

सर्वसाधारण माहिती :

| | | |
|---|---|---|
| १ | गाव /वाडी / वस्ती / तांडा याचे नाव | |
| २ | गावाचे नाव | |
| ३ | ग्रामपंचायतीचे नाव | |
| ४ | जिल्हा | |
| ५ | तालुका | |
| ६ | सन २००१ च्या जनगणनेनुसार लोकसंख्या | |
| ७ | सध्याची लोकसंख्या (वर्ष / लोकसंख्या) | |
| ८ | प्रकल्पित लोकसंख्या (वर्ष / लोकसंख्या) | |
| ९ | गाव /वाडी / वस्ती / तांडा टँकरग्रस्त आहे काय, | |

असल्यास संबंधित गावात गेल्या पाच टँकरद्वारे केलेल्या पाणी पुरवठ्याचा तपशील

| अनु.क्र. | वर्ष | टँकरचा कालावधी | टँकरची संख्या | तपशीलवार कारणे | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| १ | | | | | |
| २ | | | | | |

गाव /वाडी / वस्ती / तांडा यामधील पिण्याच्या पाण्याच्या एकूण स्त्रोतांची माहिती

| अनु.क्र. | स्त्रोताचा प्रकार | ठिकाण | पाण्याची उपलब्धता हंगामी / वर्षभर | हंगामी असल्यास किती कालावधीसाठी | पाण्याची गुणवत्ता | वापर / |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |

उपलब्ध पिण्याच्या पाणी पुरवठा साधनांचा तपशील

| अनु.क्र. | साधनांचा प्रकार | संख्या | पाण्याची उपलब्धता | |
|---|---|---|---|---|
| | | | पिण्यासाठी | अन्य उपयोगासाठी |
| १ | साध्या /खणलेल्या विहिरी | | | |
| २ | हातपंप असलेल्या विंधण विहिरी | | | |
| ३ | वीजपंप असलेल्या विंधण विहिरी | | | |
| ४ | लघु पाणी पुरवठा योजना | | | |
| ५ | दुहेरी पंप पाणी पुरवठा योजना | | | |
| ६ | नळ पाणी पुरवठा योजना | | | |
| ७ | प्रादेशिक नळ पाणी पुरवठा योजना | | | |
| ८ | तलाव | | | |
| ९ | साठवण तलाव / धरण | | | |
| १० | नदी | | | |
| ११ | नाला | | | |
| १२ | पाझर तलाव | | | |
| १३ | झरा | | | |
| १४ | मजीप्रा /मऔविमं / सिडको यांची परिसरातून जाणारी जलवाहिनी | | | |
| १५ | धरण / कालवा याखालील पाझर विहिर | | | |
| १६ | साठवण तलाव | | | |
| १७ | पाऊस पाणी संकलन योजना | | | |
| १८ | अन्य काही असल्यास | | | |

पाणी टंचाईच्या कालावधीत वापरण्यात येणारे स्रोत ( सार्वजनिक / खाजगी )

| अनु.क्र. | स्त्रोताचा प्रकार | ठिकाण | सार्वजनिक / खाजगी | पाण्याची गुणवत्ता | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |
| | | | | | |

गाव / वाडी / वस्ती / तांडा येथे अस्तित्वात असलेल्या नळ योजनेची तपशीलवार माहिती

(एकापेक्षा जास्त योजना असल्यास स्वतंत्र शीटवर माहिती द्यावी)

| | |
|---|---|
| A | योजना कार्यान्वित झाल्याचे वर्ष |
| B | पयल्यांत वर्ष |
| C | प्रकल्पात लोकसंख्या |
| D | पाणी पुरवठा योजनेवर झालेला खर्चाची उपांग निहाय माहिती |
| | स्त्रोत - , जलवाहिनी - , पंपिंग मशिनरी - , इ.- |
| | जलकुंभ- , इएसआर - , वितरण व्यवस्था - , घरगुती कनेक्शन्स - , इ. - |
| H | किती दरडोई दर दिवशी पाणी पुरवठा विचारात घेऊन नळ योजनेचा आखणी करण्यात आली आहे. |
| I | घरगुती कनेक्शन्सची संख्या |
| J | सार्वजनिक नळ कोंडाळ्यांची संख्या |
| K | गावाच्या एकूण लोकसंख्येपैकी किती लोकसंख्येसाठी योजना प्रस्तावित करण्यात आली होती. |
| L | १ किमी.च्या परिसरात वॉटरशेड डेव्हलपमेंट क्षेत्राखाली घेण्यात आलेल्या उपाययोजना |
| | दि.२८ फेब्रुवारी,२००८ च्या शासन निर्णयान्वये विहित कल्पानुसार गावात टंचाई प्रतिबंधक उपाययोजना अमलात आणलेल्या आहेत काय, असल्यास त्यांची माहिती |
| M | गावातील सर्व हातपंपांना १२ जाआय पाईप्स व कनेक्टींग रॉड्स आहेत काय |

अत्यावश्यक माहिती

| | |
|---|---|
| A | गाव / वाडा / तांडा / वस्ती यामधील किती लोकसंख्येला पिण्याच्या पाणी पुरवठा योजनेचा फायदा होत नाही |
| B | नसल्यास का |
| C | पाऊस पाणी संकलनाच्या उपाययोजना केलेल्या आहेत काय |
| D | पिण्याच्या पाण्याच्या स्त्रोतांचा एकत्रित वापर केला आहे काय |
| E | शिवकालीन पाणी साठवण योजनेअंतर्गत उपाययोजना घेण्यात आली आहे काय |

अस्तित्वातील नळ पाणी पुरवठा योजनेच्या देखभाल दुरुस्तीची मागीलआर्थिक वर्षावर आधारित माहिती

मासिक / वार्षिक खर्च

| | | |
|---|---|---|
| A | वीज देयक | |
| B | पाणी शुद्धीकरणासाठी येणारा खर्च | |
| C | वेतन | |
| D | किरकोळ दुरुस्ती | |
| E | अन्य काही असल्यास | |
| | एकूण | |

पाणीपट्टीची मासिक / वार्षिक वसूलीचा तपशील

| | | मासिक | वार्षिक |
|---|---|---|---|
| A | घरगुती कनेक्शन्सची संख्या | | |
| B | घरगुती कनेक्शनसचा त्याच्या प्रकारानुसार वार्षिक दर | | |
| C | पाणी पट्टीची वसुली रु. व टक्केवारीमध्ये | | |
| D | सार्वजनिक नळकोंडाळ्यांची संख्या | | |
| E | सार्वजनिक नळकोंडाळ्यांचा वार्षिक दर | | |
| F | पाणी पट्टीची वसुली रु. व टक्केवारीमध्ये | | |

पाणीपट्टीमध्ये वाढ करण्यासाठी करण्यात आलेल्या उपाययोजना

| | | |
|---|---|---|
| A | गावात हात पंप असल्यास त्याच्या वार्षिक देखभाल दुरुस्तीसाठी जिल्हा परिषदेकडे करार करण्यात आलेला आहे काय | होय / नाही |
| B | गावात वीजपंप असल्यास त्याच्या वार्षिक देखभाल दुरुस्तीसाठी जिल्हा परिषदेकडे करार करण्यात आलेला आहे काय | होय /नाही |

मागील तीन वर्षात प्राप्त झालेल्या देखभाल दुरुस्ती प्रोत्साहन अनुदानाचा तपशील

| | | | | |
|---|---|---|---|---|
| या निधीचा विनियोग कसा करण्यात आला | | | | |
| A | खर्च केलेला निधी | | | |
| B | शिल्लक निधी | | | |

अन्य योजनेखाली (टंचाई निवारण कार्यक्रम, बारावा वित्त आयोग, जिप सेस इ.खाली) निधी उपलब्ध झालेला असल्यास त्याचा तपशील

| अनु.क्र. | आर्थिक वर्ष | रक्कम | विनियोगाचा तपशील |
|---|---|---|---|
| | | | |
| | | | |

बाराव्या वित्त आयोगाच्या प्राप्त झालेल्या निधीपैकी किती निधी पाणी पुरवठा उपाययोजनांवर खर्च करण्यात आला त्याचा तपशील

पाणी गुणवत्ता विषयक मानके

| | | |
|---|---|---|
| A | टीसीएल पावडर उपलब्ध होते का | |
| B | फिल्ड टेस्ट किट पुरविण्यात आली आहेत का | |
| C | त्यांचा वापर होतो काय | |
| D | याबाबतचा तपशील ठेवण्यात आला आहे काय | |
| E | अहवाल जिल्ह्याला पाठविण्यात येतो काय | |
| F | जर अहवाल पॉझिटीव्ह असेल तर त्याअनुषंगाने कार्यवाही करण्यात आलेली आहे काय | |
| G | गावातील पिण्याच्या पाण्याच्या सर्व स्रोतांचे मानके तपासण्यात आली आहेत काय | |
| H | गावाला शुद्ध व स्वच्छ तसेच सातत्याने पाणी पुरवठा होतो काय | |

प्रस्तावित नवीन योजनेबाबतची माहिती (सुस्पष्ट व तपशीलवार माहिती द्यावी)

- A अस्तित्वात असलेली योजना पुरेशी का ठरत नाही
- B नवीन प्रस्तावित योजनेचा तपशील
- C नवीन योजना प्रस्तावित करण्याची सबळ कारणे
- D प्रस्तावित उपाययोजना ही कमी खर्चाची उपाययोजना आहे काय
- E प्रस्तावित उपाययोजनेचा दरडोई खर्च विहित निकषात आहे काय
- F प्रस्तावित योजनेमध्ये १०० टक्के घरगुती कनेक्शन्स विचारात घेतली आहेत काय
- G योजनेचा वार्षिक एकूण देखभाल दुरुस्ती खर्च विचारात घेऊन पाणी पट्टी निर्धारित करण्यात आली आहे काय
- H पाणीपट्टी वसूलीत सातत्याने सुधारणा करण्यात येते काय
- J गाव निर्मल ग्राम झालेला आहे काय
- K गावातील सर्व वाड्या / वस्त्यांचा विचार योजना प्रस्तावित करताना विचार केला आहे काय

प्रस्तावित स्रोताबाबतची माहिती

- स्रोताचा प्रकार
- स्रोत पुरेसा ठरे काय
- स्रोताला उन्हाळ्यात देखील पाणी उपलब्ध होईल याबाबतची खातरजमा कशी करण्यात आली आहे

--------